वर्ष १७
अंक २ रा
१५ ऑगस्ट १९४३

# समाज स्वास्थ्य



संपादक -
र. धों. कर्वे.
एम्. ए.

किंमत
३
आणे

# पुणेकरांची सोय

**श्री. शकुंतलाबाई परांजपे** ह्या स्त्रियांस स्वतः तपासून योग्य आकाराच्या रबरी टोपीची निवड करून ती वापरण्या-संबंधी संपूर्ण माहिती देतील. टोपीबरोबर वापरावी लागणारी जेली, व टोपीही त्यांजकडेच विकत मिळेल. गरजूंनीं त्यांजकडे चौकशी करावी. भेटण्याची वेळ, दुपारीं ३ ते ५.

पत्ताः—**नं. १२२०, रँगलर परांजपे रोड, भांबुर्डा; पुणें—४**

# मुंबईत सोय

स्त्रियांस तपासून, योग्य आकाराची टोपी निवडून, ती स्वतःला बसवण्यास शिकवून संपूर्ण माहिती देण्याचें काम **श्री. मालती-बाई कर्वे** करतात. भेटण्याची वेळ सकाळीं ९ ते १० व दुपारीं ३ ते ४. पत्ताः-**नं. १३, नवी भटवाडी, गिरगांव, मुंबई.**

# पुणें येथील ग्राहकांची सोय

आमचीं सर्व पुस्तकें, डच् कॅप् व राइट कॉन्ट्र्-सेप्टिव्ह जेली नं. ६९-१ लॉ कॉलेज रोड, येथें **प्रो. दि धों. कर्वे,** यांजकडे रोखीनें विकत मिळेल.

( भेटण्याची वेळ सकाळीं ७–३० ते ९–३० )



मुद्रण स्थळः—पॉप्युलर प्रिंटिंग प्रेस, १०३, ताडदेव रोड, मुंबई नं. ७

मुद्रक व प्रकाशकः—**रघुनाथ धोंडो कर्वे, राइट् एजन्सी,**
नं. १३, नवी भटवाडी, गिरगांव, मुंबई.

वर्ष १७, अंक २ रा

ऑगस्ट १९४३

# अनुक्रमणिका

| विषय | | पृष्ठ |
|---|---|---|
| १. | मृतात्म्यांचा इतिहास—२ ... ... ... | २५ |
| २. | कूळ कीं खूळ? ... ... ... ... | ३० |
| ३. | पुणेरी नीतिबाजीचें प्रदर्शन ... ... ... | ३६ |
| ४. | पत्रव्यवहार ... ... ... ... ... | ३९ |
| ५. | शारदेचें पत्र ... ... ... ... ... | ४४ |

## वर्गणीची माहिती

हें मासिक दर महिन्याचे १५ तारखेस प्रसिद्ध होतें. कोणत्याहि महिन्या-पासून वर्गणीदार होतां येईल. वार्षिक वर्गणी ट. हां. सह दोन रुपये. हिंदुस्थाना-बाहेरील ग्राहकांस रु. २॥ किंवा ४ शिलिंग. व्ही. पी. मागविल्यास चार आणे जास्त पडतील.

**पोर्तुगीज प्रांतांत व्ही. पी. पाठवणार नाहीं.**

वर्गणीबद्दल **पोस्टाचीं तिकिटें घेतलीं जाणार नाहींत.** पैसेच पाठवावे.

**पुणें येथील ग्राहकांनी** प्रो. दि. धों. कर्वे, ५९–१ लॉ कॉलेज रोड, यांजकडे वर्गणी भरल्यास चालेल. किरकोळ अंकही तेथें मिळतील.

अंक न पोंचल्याची तक्रार महिना संपण्याचे आंत आम्हांस मिळाली पाहिजे.

**इतर ग्राहकांस पत्ता :**—राइट एजन्सी,

नं. १३, नवी भटवाडी, गिरगांव मुंबई.

मागील अंकास चार आणे, तीन अंकांस दहा आणे, नमुना फुकट. अमुकच महिन्याचा अंक नमुन्याकरतां मिळणार नाही.

**गर्भप्रतिबंधक औषध**

" राहत " ३ दिवस घेतल्यानें गर्भधारणा कायमची बंद पडते. विटाळ चालू. गॅरंटी सोबत, किं. ५॥ रु. सल्यासाठी भेटा.

**बंद विटाळ**

तीनच दिवसांत **"थ्रिनोट"** औषधानें सुरू होतो. गॅरंटी सोबत, किंमत रु. ५-८-०, सल्ला फुकट. टे. नं. २१३४३

डॉ. **एस्. एच्. खान**, ४२ एस्. जे. चर्चगेट स्ट्रीट, फोर्ट, मुंबई.

**बंद विटाळ** रजो **पिल्सनीं** सुरू होतो. किं. रु. ५-८-० ट. ख. नि.

**डॉ. गोळे लॅबोरेटरी** ३०, प्रार्थना समाजाचे समोर, गिरगांव, मुं. ४. स्टॉकिस्टः—माधव एजन्सी, गिरगांव मुंबई नं. ४., दादर जनरल स्टोअर्स, छबिलदास रोड, दादर., स्वस्तिक मेडिकल स्टोअर्स, मेन रोड, सोलापुर.

**कामोत्तेजक नं. १.** हें केवळ कामोत्तेजक नसून शक्तिवर्धकहि आहे, हें बरेच दिवसपर्यंत चालू ठेवण्यास हरकत नाही. पुरुषांस व स्त्रियांसही उपयोगी. चार औंसांची बाटली ८ दिवस पुरते, किंमत ४ रुपये, व्ही. पी. ने रु. ५.

**कामोत्तेजक नं. २.** अमुक प्रसंगीं कसें होईल अशी ज्यांस आशंका वाटत असेल अशा पुरुषांनी विशिष्ट प्रसंगीं घेण्याकरतां हें औषध आहे. एका वेळीं १ औंस. परिणाम न झाल्यास एका तासाने पुनः घ्यावें, परंतु नेहमी घेऊं नये. चार औंसांचे बाटलीस ६ रु., व्ही. पी ने रु. ७.

**राइट एजन्सी, १३, नवी भटवाडी, मुंबई—४.**

**गर्भ प्रतिबंधा करिता**

**BANG बँग**

१०० टक्के गुणकारी. शस्त्रक्रिया नको. वापरण्यास सोपें. सर्वत्र मिळतें.

शिवलोक REGD.

**शिव आणि लोक.** ५७३, शनिवार, पुणे 2.

एजंट, नाभा एजन्सी, कांदेवाडी, मुंबई—४.

ऐका मध्यम वयाच्या श्रीमंत गृहस्थास तरुण व सुस्वरुप मैत्रीण पाहिजे. आर्थिक मदत मिळेल.

'क्ष' C/o समाजस्वास्थ्य.

अश्लीलता हा कोणत्याही लेखाचा, चित्राचा किंवा इतर वस्तूचा गुण नसून तो फक्त तसा आरोप करणारांच्या मनाचा गुण होय.

# मृतात्म्यांचा अितिहास–२

मागील लेखांत सांगितल्याप्रमाणें मृतात्म्यांच्या आधुनिक चळवळीचा अितिहास गेल्या ८० वर्षांतला आहे. अर्थात् भुतांशीं आपला परिचय आहे असें सांगणारे लफंगे यापूर्वी नव्हते असें नाही. ते कोणत्याही कालांत आणि कोणत्याही देशांत होतेच. 'बांटू' लोकांच्या धर्मगुरूंपासून निओप्लॅटॉनिक तत्ववेत्त्यांपर्यंत, अमेरिकेंतील ताम्र लोकांच्या वैदूंपासून तों थेट स्वीडनबोर्ग-सारख्या आधुनिक वैदूंपर्यंत, सर्वांचा समावेश यांत करावा लागेल. परंतु या चळवळीला व्यवस्थित धार्मिक स्वरूप आलें तें अमेरिकेंत, १८५० च्या किंचित् पूर्वीपासून.

त्यापूर्वी मृतात्मे कोणताही संदेश न देतां स्वस्थ कां बसले होते, असें कोणी विचारल्यास हे लोक सांगतात की या सुमारालाच जडवादाची लाट पसरत चालली होती, आणि तिला कांही आळा घालावा म्हणूनच मृतात्म्यांनी त्या सुमाराला लोकांना आपल्या अस्तित्वाचा पुरावा देण्याचें ठरवलें. अितिहासज्ञांना कदाचित् असें वाटेल की पूर्वीच्या धर्मावरची श्रद्धा नाहीशी झाल्यामुळें नव्या धर्मांचा विचार करण्याची लोकांची तयारी होती; पूर्वी एकदां प्राचीन रोमन लोकांच्या वेळीं असेंच झालें होतें, आणि त्याचीच ही पुनरावृत्ति आहे. वस्तुतः हीं दोन्ही विधानें चूकच आहेत. या नव्या धर्मांचा अर्थ अितकाच आहे की लोक आतां धर्मगुरूंच्या जुलमांतून मोकळे झाले होते. प्राचीन रोममधेंही असेंच झालें होतें. चौथ्या शतकाच्या सुमारास लोकांना पूर्ण धार्मिक स्वातंत्र्य मिळालें होतें, पण पुढें रोमन बादशहा ख्रिस्ती होऊन लोकांचा छळ करूं

लागल्यावर तें नाहींसें झालें. शिवाय मध्ययुगांत देखील नवे धर्म निघतच होते, आणि त्यांना अनुयायीही मिळत होते.

खरें पाहिलें तर या नव्या धर्मांची बाधा नास्तिकांना फारच थोडी झाली. अशा लोकांपैकी रॉबर्ट ओवेन आणि त्याचा मुलगा हे दोघेच फक्त या नव्या धर्माला जाऊन मिळाले. बाकीचे जे अनुयायी त्यांना मिळाले, ते मूळचे धार्मिकच होते, नास्तिक नव्हते. पूर्वी सांगितल्याप्रमाणें अंड्रयू जॅकसन डेव्हिसने पुस्तक लिहिलें त्या वेळीं त्याने शपथेवर सांगितलें की मी कादंबऱ्यांपलीकडे कांहीं वाचलेलें नाही. पण ही थाप होती असें त्याच्याच मित्रांनी कबूल केलेलें आहे आणि त्याच्या पुस्तकांत जें अर्धेकच्चें शास्त्रीय ज्ञान दिसतें, त्यावरूनहि हेंच सिद्ध होतें. तो शपथेवर खोटें बोलला, इतकेंच.

यानंतर १८४८ सालीं हाअिड्स्व्हिल नांवाच्या एका खेड्यांत या चळवळीचा उगम झाला. या खेड्याजवळ कोणतेंही मोठें शहर नव्हतें. तें न्यू यॉर्क संस्थानांत, परंतु न्यू यॉर्कपासून अडीचशें मैलांवर आहे. तेथून तीस मैलांवर रॉचेस्टर हें त्यावेळीं फार लहान शहर होतें. या सुमाराला मेस्मेरिझमचा बराच प्रसार झाला होता आणि ‘ मेस्मेराअिझ ’ केलेला मनुष्य मृतात्म्यांच्या ताब्यांत असतो ही कल्पना बरीच पसरली होती. तेव्हां याच कल्पनेचा आधार घेऊन ही चळवळ सुरू झाली.

हाअिड्स्व्हिल येथे फॉक्स नांवाचा एक शेतकरी रहात असे, आणि त्याला मार्गारेट्टा आणि केटी नांवाच्या अनुक्रमें १५ व १२ वयाच्या मुली होत्या. या मुलींचा हा सर्व उद्योग होता. मृतात्म्यांनी आपल्या उद्योगाला हें लहानसें खेडें कां शोधून काढलें हें समजणें कठिण, पण क्षुल्लक गोष्टींचें अवडंबर माजवायला तीं उत्तम जागा होती यांत शंका नाहीं. १८४८ च्या फेब्रुवारी महिन्यांत फॉक्सला, त्याच्या बायकोला आणि शेजाऱ्यापाजाऱ्यांना त्यांच्या घरांच्या भिंतीवर आणि दारांवर ठोके ऐकूं येऊं लागले. याच सुमाराला मॅसाचूसेट्स्मधील अेका नोकरिणीमार्फत ठोके वाजवून मृतात्म्यांनीं बरीच गडबड उडवून दिली होती, आणि

ती हकीकत वर्तमानपत्रांत आलेली असल्यामुळे या खेड्यांत ती पोंचली होती. फॉक्सचा अशा गोष्टींवर विश्वास नव्हता, पण स्वतःच्या घरांत ठोके ऐकूं आल्यामुळे तो गोंधळला. या गोष्टीचा त्या गांवांतच बभ्रा होऊन न थांबतां ती सर्व प्रांतांत गाजली.

मॅसाचूसेट्स्मधल्या त्या नोकरिणीला या फसवणुकीबद्दल दोन महिन्यांची तुरुंगाची शिक्षा झाली, आणि तेव्हांपासून मृतात्म्यांनीं तिला त्रास दिला नाही ! पण या फॉक्स मुलींची अेक विवाहित बहिण होती, तिने यावर व्यापार करण्याचें ठरवलें. तिचें नांव लिआ फिश आणि ती रॉचेस्टर येथें संगीताच्या शिकवण्या करीत असे. तिचा नवरा कदाचित् पूर्वीच मेलेला असावा, कारण त्याचें नांव कोठेहि आलेलें नाही. तिने हा मृतात्म्यांचा धंदा प्रथम सुरू केला, आणि तिचें जेव्हां बहिणींशीं नंतर भांडण झालें, तेव्हां ती अट्टल खोटें बोलणारी होती हें त्यांनी सांगितलें. हाअिड्स्व्हिल येथील ठोक्यांवर तिने अेक कादंबरी रचून सांगितली. तिने असेंही उठवलें की या मृतात्म्यांच्या प्रकरणामुळे तिच्या आअीचे केंस आठ दिवसांत पांढरे झाले. या ठोक्यांच्या द्वारें मृतात्म्यांकडून प्रश्नांना उत्तरें मिळवण्याची युक्ति तिच्याच डोक्यांतून निघाली, आणि या मध्यस्थीच्या शक्तीची त्या कुटुंबाला शेवटीं भीति वाटूं लागली असेंहि ती म्हणाली. खरी गोष्ट अशी की मुलींच्या बापाने तें घर सोडून दिलें. मार्गरेट्टा अेका स्नेह्याच्या घरीं रहायला गेली आणि केटी लिआकडे गेली. हाअिड्स्व्हिल येथे या मुली असतांना जे ठोके अैकूं येत असत, ते आतां त्या मुलींबरोबरच त्यांच्या दोन नवीन घरीं गेले. ज्या मृतात्म्याची मध्यस्थी त्या करीत होत्या, त्याचे दोन भाग होऊन तो दोघींत वांटला गेला ! नंतर या दोन्ही ठिकाणीं अितर मध्यस्थ उत्पन्न झाले आणि जिकडेतिकडे ठोके अैकूं येऊं लागले आणि लोकांना बोलायला सर्वत्र हाच विषय झाला. आतां यांतून पैसे कसे काढतां येतील हा प्रश्न राहिला. लिआने याविषयी अेक कल्पित गोष्ट आपल्या डोक्यांतून काढली. ती म्हणाली, ' मृतात्म्यांनीच आम्हाला ( लिआ व केटी यांना ) असा उपदेश केला की अेक हॉल भाड्याने घेऊन हे चमत्कार पाहण्याकरतां लोकांना तिकिटें लावून आंत घ्यावें.

आम्हीं प्रथम कबूल केलें नाहीं, पण मग मृतात्म्यांनी सांगितलें की आमचें तुम्ही न अैकल्यास आम्ही पृथ्वी सोडून जाऊं आणि मग मनुष्यजातीला आम्ही जें गूढ ज्ञान देणार आहोंत तें त्यांना मिळणार नाही ! तरी देखील यापासून पैसे मिळविण्यांत मला कमीपणा वाटला.' परंतु लवकरच दुसरा अेक मध्यस्थ तिला भेटायला आला, आणि १८४८ च्या अखेरीला मृतात्म्यांचा व्यापार दृढ पायावर उभा झाला.

यांत प्रथमपासूनच कपट व पैशाचा लोभ दिसून येतो. त्या कुटुंबांत फक्त जॉन फॉक्स अेवढा अेकच प्रामाणिक मनुष्य होतां, आणि तो बाकीच्यांशीं भांडला असला पाहिजे असें दिसतें, कारण तें कुटुंब यापुढें अेकत्र दिसत नाही. १८५० पर्यंत त्याची बायको व तीन मुली यांनी अलोट पैसा मिळविला होता. या बहिणींना जिकडून तिकडून बोलावणीं येत असत आणि पैसेही खूप मिळत असत. कांही दशकेंपर्यंत अशा रीतीने पैसे मिळवल्यावर त्यांचीं लग्नें चांगल्या माणसांशीं झालीं. मार्गारेट्टाचें लग्न प्रसिद्ध आर्क्टिक् प्रवासी कॅप्टन केन याच्याशीं झालें, आणि तो जिवंत होता तोंपर्यंत त्याने तिला लबाडी करूं दिली नाही. केटीचें लग्न जेन्केन नामक ब्रिटिश वकिलाशीं झालें. हा मध्यस्थाचा धंदा चाळीस वर्षें केल्यावर या दोघींनीही कबूल केलें की आपण अव्वलपासून अखेरपर्यंत लबाडीच केली होती !

मृतात्म्यांचे पुरस्कर्ते यासंबंधी लिहितांना असा आव आणतात की हें सर्व खोटें आहे. हिल हा त्यांतल्यात्यांत प्रामाणिक लेखक आहे. तो म्हणतो की कांही मध्यस्थांनी आपली लबाडी कबूल केल्याचा थोडाबहुत पुरावा मिळतो. वस्तुस्थिति अशी आहे की मार्गारेट्टा व केटी यांची कबुली प्रथम १८८८ सालीं 'न्यू यॉर्क हेरल्ड' या पत्रांत, नंतर न्यू यॉर्क येथे एका जाहीर व्याख्यानांत, आणि नंतर त्यांच्या मदतीने लिहिलेल्या एका पुस्तकांत आलेली आहे. कोणताही ऐतिहासिक पुरावा यापेक्षा सबळ असणें शक्य नाही. 'न्यू यॉर्क हेरल्ड'च्या २४ सप्टेंबर १८८८ च्या अंकांत हा पुरावा कोणालाही सांपडेल. याचे मुळाशीं लिआ व मार्गारेट्टा यांचें भांडण होतें. या दोन्ही बहिणी दारूबाज होत्या, या

सबबीवर लिआने मार्गरेट्टाचीं मुलें कोर्टामार्फत तिच्यापासून दूर केलीं होतीं. याचा सूड म्हणून मार्गरेट्टाने मृतात्म्यांचीं सर्व बिंगें बाहेर काढलीं. न्यू यॉर्क हेरल्डमधें तिने लिहिलें की आपण पायांच्या बोटांनी ठोके मारीत होतों, आणि ही गोष्ट बफेलो युनिव्हर्सिटीच्या प्रोफेसरांना प्रथमपासून कळली होती आणि त्यांनी तसें जाहीरही केलें होतें. याला लिआनें व्यापारी स्वरूप दिलें, आणि तिने त्याची जी हकीकत सांगितली ती सारी बनावट होती. त्याचप्रमाणें १८४८ पासून १८८८ पर्यंतच्या चाळीस वर्षांत झालेले मृतात्म्यांसंबंधीं सर्व प्रयोग खोटे होते. म्हणजे आमच्यासारखे अश्रद्धाळू लोकच या चळवळीला लबाडी म्हणतात असें नव्हे, तर जिने तिची सुरवात केली आणि जी तींत प्रमुख होती, त्या मिसेस केन ( मार्गारेट्टा फॉक्स ) नेच ती लबाडी होती असें म्हटलेलें आहे. निदान या चळवळीच्या ८० वर्षांपैकी पहिल्या निंम्या भागाबद्दल तिने अशी खात्री दिली आहे.

तिची बहिण मिसेस जेन्केन ( केटी फॉक्स ) ही या वेळीं अिंग्लंडांत होती, पण ती पुढच्याच महिन्यांत न्यू यॉर्कला आली आणि ही सर्व लबाडी होती असें तिनेही सांगितलें. अितकेंच नव्हे तर मृतात्म्यांच्या कांही पुरस्कर्त्यांनीं हे ठोके पायांच्या बोटांनी वाजवणें अशक्य आहे असा ओरडा केल्यामुळे तिने अेक हॉल भाड्याने घेतला आणि ते तसे वाजवतां येतात असा प्रत्यक्ष प्रयोग करून पुरावा दिला. यानंतर या दोघी बहिणींनी डेव्हनपोर्ट यांना एक पुस्तक लिहायला मदत केली, आणि त्यांतही पुन: तसेंच विधान केलें की या चाळीस वर्षांत अिंग्लंडांत किंवा अमेरिकेंत असे जे जे प्रयोग झाले, ते सर्व लबाडीचे होते, आणि त्यांतले सर्व मध्यस्थ लफंगे होते.

आतां हें खरें की कांही दिवसांनी केटीने आपलें विधान परत घेतलें. परंतु तें परत घेतल्याने खोटें थोडेंच ठरतें ? अशा तऱ्हेने स्वतःवर खोटे-पणाचा खोटा आरोप कोण करील ? आणि त्यांनी स्वतः पुरावा दिला तो खोटा कसा ठरेल ? केटीवर पुनः आपलीं मुलें दूर होण्याचें संकट येऊं पहात होतें, म्हणूनच तिने आपलें विधान परत घेतलें, पण तिच्या बहिणीने आपलें विधान

परत घेतलें नाही, तेव्हा केटीच्या परत घेण्याला बिलकुल महत्व देतां येत नाही हें उघड आहे. शिवाय वस्तुस्थिति अशी आहे की या चाळीस वर्षांत ज्यांनी हे प्रयोग केले, त्या सर्व मध्यस्थांना लबाडींत पकडलेले आहेत, आणि त्यांवर लबाडीचा आरोप सिद्ध झालेला आहे.

या चळवळीच्या मुळाशीं सगळी लुच्चेगिरीच होती. प्रथम डेव्हिसच्या पुस्तकाची न्यू यॉर्कमधली लबाडी, आणि नंतर फॉक्स बहिणींची आणि अशाच इतरांची लबाडी, या लबाड्या चाळीस वर्षेपर्यंत चालू होत्या. ज्या मध्यस्थांमुळे रॉबर्ट ओवेन, प्रो. हेअर, डॉ. आल्फ्रेड रसेल वॉलेस, सर ऑलिव्हर लॉज, प्रो. मायर्स, सर डब्ल्यू क्रुक्स वगैरे लोक या चळवळीला मिळाले, ते सर्व लबाड होते. परंतु तरीदेखील मृतात्म्यांचे पुरस्कर्ते या शास्त्रज्ञांचीं नांवें आधार म्हणून पुढें करतात ! तेव्हां यांचा थोडा जास्त विचार करणें जरूर आहे. (अपूर्ण)

---

# कूळ कीं खूळ ?

—या डाक्तर, बसा....तेथे नाही, येथे माझ्या शेजारीं बसा.

—काय, कशाला बोलावलें होतें ?

—बसा म्हणजे सांगतें...अस्सें. सहज गप्पा मारायला बोलावलें होतें.

—गप्पा मारायला मला कोठे वेळ आहे बरें ?

—मला माहीत आहे तुमच्याकडे रोग्यांची गर्दी असते ती. पण मी सुद्धां रोगीच आहे ना ? माझ्यासाठी थोडासा वेळ......

—कमळाबाई, आपण आतां बऱ्या झालांत. आपल्याला आतां डाक्तराची गरज नाही.

—डाक्तराची नसेल, पण तुमची मला गरज आहे.

—मी जर कारणाशिवाय येथे येऊन आपल्याशीं गप्पा मारीत बसलों तर लोक काय म्हणतील बरें ?

—लोक काय म्हणणार ? रोग्याला बरें वाटावें म्हणून नको का थोडा वेळ बोलत बसायला ?

—असें आपण म्हणतां, पण...

—मला ' आपण ' नका म्हणूं गडे. मी म्हणतें ' तुम्ही ' आणि तुम्ही म्हणतां ' आपण.' हें बरें दिसतें का ?

—ज्याने त्याने आपआपल्या दर्जाप्रमाणें वागावें हें बरें. आपले वडील आहेत बडे सरदार. आणि मी कोण आहें हें आपल्याला माहीत नाही, म्हणून आपण असें म्हणतां.

—माहीत कसें नाही ? तुम्ही एक नांवाजलेले डाक्टर आहांत. म्हणून काय तुमचा दर्जा कमी झाला ?

—डाक्टर आहें खरा. पण त्याशिवाय, आपल्याकडे अेक रामा नांवाचा हुजऱ्या होता ना ? त्याचा मी मुलगा. कां चपापलांत शा ? आतां सांगा मला, हें विसरून चालेल का ?

—मला माहीत नव्हतें म्हणून मी चपापलें. पण त्यांत काय मोठेंसें आहे ? मनुष्याचा दर्जा त्याच्या कर्तबगारीवर असतो. हुजऱ्याचा मुलगा जर आपल्या कर्तबगारीने प्रख्यात डाक्टर झाला, तर त्याचा दर्जा आपोआपच वाढत नाही का ? मी तुम्हाला डाक्टर म्हणून ओळखतें. तुम्ही होतां म्हणून मी आज जिवंत आहे. किती तरी दिवस माझें शरीर तुमच्या ताब्यांत होतें, नाही का ? आणि माझें मन कांहीं शरीराच्या बाहेर नसतें. तेव्हां...

—छे छे छे ! असें बोलणें सुद्धा बरें नव्हे.

—हें पहा, तुम्हाला मी आवडत नसलें तर तसें सांगा. म्हणजे मी अधिक बोलणार नाही.

—असा गैरसमज करून घेऊं नका. पण हा माझ्या अब्रूचा प्रश्न आहे. डाक्टरांना रोग्यांशीं फार जपून वागावें लागतें.

—पण तुम्हीच तर आत्तां म्हणालांत मी बरी झालें म्हणून ! मग आतां रोग्याचा काय सबंध आहे ? तें कांही नाही, ही आदबी आतां बस झाली. तुम्ही मला ' तूं ' म्हणेपर्यंत मी तुम्हाला येथून सोडणार नाही.

—तें कांही कठिण नाही, पण तुझे वडील काय म्हणतील ?

—अस्सें ! आतां कसे ताळ्यावर आलांत ? आतां दुसरें असें की मी वयांत आलेली आहे, तेव्हां आतां लग्नाला परवानगीची जरूरी नाही. येथे लंडनमध्येंच लग्न उरकून घेऊं. म्हणजे मग कोणी कांही करूं शकणार नाही.

—छे छे, तें शक्यच नाही. कोणी कांही करूं शकणार नाही हें खरें, पण चोरून लग्न करण्यांत मला कमीपणा आहे. हा हुजऱ्याचा मुलगा, राजरोस मागणी घालणें शक्य नाहीं, म्हणून यानें हें कारस्थान केलें, असें तुझ्या वडिलांनी म्हटलें तर मला कांही बोलायला तोंड राहील ?

—मी यापेक्षा जास्त काय सांगूं ? आठच दिवसांत आम्ही सगळीं परत जाणार. त्यांतून तें संस्थान. तेथे गेल्यावर कांही माझी धडगत नाही. मग काय ? ही आपली शेवटची भेट समजायची ?

—नाही, मी पोंचवायला येईन ना ?

—तसें काय उपयोग ? त्यापेक्षा तुम्ही येऊंच नका. तुम्ही आलांत तर मला रडायला येईल कदाचित्.

—यांतून मला तर कांहीं तोड दिसत नाहीं.

\+ \+ \+

कमळा आईबापांबरोबर संस्थानांत जाऊन पडली. लग्नासंबंधी आईबापांचे बेत चालले होते.

—दौलतरावांकडून मागणी आली आहे आपल्या कमळाबाईला.

—आजपर्यंत थोड्या का मागण्या आल्या ? पण ती कबूल करील तेव्हां ना ?

—मी आतां तिच्या कबुलीची वाट पाहणार नाही. काय झालें तिला कबूल न करायला ? पिढीजात सरदार घराणें आहे दौलतरावांचें. अगदीं आपल्या तोडीचें. असें स्थळ पुन्हा मिळायचें नाही.

—असें कसें करून चालेल हल्लींच्या काळीं ? आणि तिला जर मारून मुटकून कोठेतरी द्यायची होती, तर तिला विलायतेला कशाला नेऊन आणली ?

तेथलें पाहून मुलींना वाटतें आपणही स्वतंत्र व्हावें. आणि आपले अिकडे हे विचार. हें जमायचें कसें ?

—तुम्हाला काय वाटतें, विलायतेंत सगळीं लग्नें प्रेमामुळे होतात म्हणून ? गरीबगुरिबांना तें ठीक आहे, पण सरदार घराण्यांत प्रेमाची मातब्बरी नसते. विलायतेंतले सरदार देखील कूळ आणि पैसा एवढ्याच गोष्टी पाहतात लग्नें करतांना. मोठेपणाबरोबर कांही जबाबदारी येतेच की नाही ? तिलाही एवढें कळलें पाहिजे.

—तिच्या मनानें एकच ध्यास घेतला आहे. तिला दुसरें कांही दिसत नाही.

—म्हणते तरी काय ती पोरटी ?

—ज्या डाक्तराने माझा प्राण वांचवला, त्याच्याशिवाय कोणाच्याही गळ्यांत मी माळ घालणार नाही, असें तिने मला स्पष्ट सांगितलें. आपल्याजवळ बोलायला ती भिते.

—अस्सें ! त्या हुजऱ्याच्या पोराचें हें कारस्थान आहे.

—त्या बिचाऱ्याची कांही चूक नाही. मी त्यांचें बोलणें आडून ऐकलें. तो तिची समजूत घालीत होता, पण हींच हट्ट घेऊन बसली.

—म्हणजे तुम्ही त्याची तरफदारी करतां. तुम्हाला पसंत आहे का तो जांवअी ? हुजऱ्याच्या पोराचें माझ्या मुलीशीं लग्न ! हंः !

—असें नका म्हणूं. हुजऱ्याचा पोर झाला तरी अेवढ्या वयांत त्याने यूरोपांत कीर्ति मिळवली आहे. म्हणूनच आपण तरी बोलावला ना त्याला ? शिवाय तो आपल्याच जातीचा आहे.

—नुसती जात काय करायची ? कूळ पहावें लागतें. खानदानी घराणें आहे आमचें. तें कांहीं नाही, दौलतरावालाच देणार मी तिला. आणि त्याच्या पैशाचा पाठिंबा आपल्याला पाहिजे आहे हें विसरूं नका.

—अस्सें ? म्हणजे कमाला विकायला काढली आहे आपण ?

—बोलायला काय होतें तुम्हाला? बायकांना जबाबदारी म्हणून कशी ती कळतच नाही!

शेवटीं लग्न झालें. लग्नाच्या दिवशीं डॉक्टर लक्ष्मणराव चव्हाण मुंबअीच्या बंदरांत उतरणार, ही बातमी वर्तमानपत्रांत आली होती, पण ती कमळला कळूं दिली नाही. आणि कळली असती तरी ती काय करणार होती?

दौलतराव दिलदार मनुष्य होता. त्याने तिला उत्तम रीतीने वागवली. तिने हट्टच धरला असता, तर त्याने तिच्यावर बळजबरी कधीच केली नसती. पण तिने तसा भलताच हट्ट धरला नाही, आणि परिणामीं तिला अेक रोग जडला. त्याचे परिणाम दौलतरावांना निदान बाह्यतः तरी फारसे बाधले नव्हते, पण तिला मात्र ते जाणवले. दौलतरावांना पूर्वीची हकीकत कांहीच माहीत नव्हती, तेव्हां मुंबअींतले प्रख्यात डाक्तर म्हणून डॉ. चव्हाणांनाच पाचारण केलें. आणि त्यांची कमळशीं पुन्हा अकल्पित गांठ पडली.

कमळला तपासतांच त्यांच्या अंगावर शहारे आले. त्यांनी कडक उपचार केले आणि दौलतरावांना बजावून सांगितलें की उपचार आणि पथ्य बरोबर केल्यासच रोग बरा होण्याचा संभव आहे. पथ्य अितकेंच की त्यांनी कमळपासून दूर रहावें. त्यांत त्यांना कांहीच कठिण नव्हतें, कारण अितर बायकांना तोटा नव्हता!

कमळा बरी होत आली, पण दौलतराव मात्र रोगाच्या आणि दारूच्या पायीं अेका वर्षांतच निजधामाला गेले. कमळाला कांहीं महिने प्रथम गेले होते, पण रोगामुळे बाळंतपणापर्यंत वेळ आली नाहीं.

कमळा आतां स्वतंत्र झाली होती. पण तिचा रोग साफ बरा व्हायला अजून बराच अवधि लागेल, असें डाक्तरांचें म्हणणें पडलें. उपचार चालूच होते आणि त्यांची पुष्कळ वेळां गांठ पडत असे. दौलतराव दिवंगत झाल्याला अेक वर्ष झालें होतें. कमळाची स्थिति केविलवाणी झाली होती. अशा स्थितींत ती अेकदां डाक्तरांना म्हणाली, डाक्तर, अेक प्रश्न विचारूं का?

—खुशाल विचारा की ! तुम्ही मला भ्यायला कधीपासून लागतांत ?

—प्रश्न जरा नाजूक आहे म्हणून भितें.

—कांही भ्यायचें कारण नाही, बेलाशक विचारा.

—डाक्तरींच्या धंद्याला लग्न केलेलें बरें असें म्हणतात. तुम्ही लग्न कसें नाही केलेंत ?

—कमळाबाओी, हें तुम्ही विचारतां ? एकतर मी धंद्याकरतां लग्न करणारा मनुष्य नव्हे, आणि आतां मी विचारूं का तुम्हाला एक प्रश्न ?

—हो, खुशाल विचारा.

—तुम्ही करतां का माझ्याशीं लग्न ? बाकी आतां तुम्हाला विचारायचें म्हणजे सुद्धां पंचाअीत. मी पैशाकरतां लग्न करतों असें म्हणतील लोक.

—तें राहूं द्या, पण असा हा रोग घेऊन मी कसें लग्न करणार ? म्हणून तर मी कांही बोललें नाही. प्रथम मींच तुम्हाला विचारलें होतें, लक्षांत आहे का ?

—मग तुम्ही म्हणाल तेव्हां आतां माझी तयारी आहे. त्यांत रोगाचा काय प्रश्न आहे ? मी डाक्तर आहें हें विसरूं नका. रोग मी बरा करीन अशी माझी खात्री आहे. एरवीं मी विलायतेला काय शिकलों अशी तुमची कल्पना आहे ?

—मग मी का नाही म्हणतें आहें ?

—तर मग आतां कोणालाच भ्यायचें कारण नाही. उद्यांच मुंबअीला जाऊन लग्न उरकून घेऊं, आणि मग आपल्या वडिलांना कळवा सावकाश, होऊन गेल्यावर.

—हो, तेंच बरें, नाहीतर ते त्रागा केल्याशिवाय राहणार नाहीत.

शेवटीं दोघांच्या मनासारखें झालें, आणि कमळच्या आअीने कमळला चोरून पत्र लिहून आपला आशीर्वाद दिला. बापानें मात्र खूप संतापून कमळाचें कोणी नांव काढतां नये असें सर्वांना बजावलें.

---

# पुणेरी नीतीबाजीचें प्रदर्शन

हर्षे-पानसे विवाहाचे बाबतींत पुण्याच्या 'महाराष्ट्र'ने जें अकांडतांडव सुरू केलें आहे, त्याला तेथील तथाकथित 'संस्कृतिसंरक्षक मंडळा'ने अेक निषेधाची जाहीर सभा बोलावून दुजोरा दिला आहे. हिंदुधर्मांत रखेल्या ठेवण्याची जशी पूर्ण मुभा आहे, तशीच असंख्य बायका करण्याचीही आहे, हें लक्षांत घेतल्यास या लोकांच्या मताने संस्कृतीचा आणि धर्माचा कांही संबंध असेल असें दिसत नाही. यांची संस्कृतीची व्याख्या बहुधा अशी असावी की यांच्या डोक्यांत वेळोवेळीं ज्या कल्पना येतील तीच संस्कृति ! अर्थात् ते उघडपणें तसें सांगणार नाहीत. बरें 'शास्त्राद्रूढिर्बलीयसी' म्हणावें तर आपल्या ऐपतीप्रमाणें अनेक बायका करण्याची रूढि फार जुनी आहे आणि अजूनही ती बदललेली नाही. जमीनदार, जहागीरदार, संस्थानिक, वगैरे दोनच बायका करून थांबत नाहींत, पण त्यांच्या बाबतींत ब्र काढण्याची 'महाराष्ट्र'च्या संपादकांची छाती होत नाही. कोल्हापूरच्या महाराजांनीं दोन बायका केल्या तरी त्यांच्या राज्यांत निषेधाची सभा होत नाहीं यांत नवल नाही, पण ती पुण्यांतही होत नाही. बावड्याच्या अधिपतींना अेक बायको असतांना दुसरी करण्याची अिच्छा झाली, तेव्हां पुण्याच्या सरदार रास्त्यांनी आपली सुशिक्षित कन्या त्यांना समारंभाने अर्पण केली ! त्या वेळीं हे लोक काय झोपा घेत होते ? पण बड्या लोकांच्या विरुद्ध लिहिण्याची संपादकांची छाती होत नाही. अेखादा गरीब मनुष्य यांच्या तावडींत सांपडला की मग मात्र त्यांना राहवत नाही. मग त्यांची संस्कृतीची भक्ति उसळून बाहेर येते. पण ज्यांना धर्माचीही पर्वा नाही आणि रूढीचीही नाही, त्यांना संस्कृतीचें नांव काढण्याचा काय हक्क आहे ? असे हे कोण टिकोजी लागून गेले आहेत की ते म्हणतील ती संस्कृति म्हणून लोकांनी मान्य करावी ? अशीं लग्नें ज्या लोकांनी केलीं आहेत त्यांची अेक यादी महाराष्ट्राच्या संपादकांनी दिली आहे. तरीपण त्यांनी कांही महत्वाचीं नांवें वगळलीं आहेत. नामदार गोखले, जस्टिस नियोगी, प्रो. आवटी, डॉ. के. के. जोशी, श्री. गडकरी, श्री. वरेरकर, श्री. शं. पां. जोशी (नाटककार), श्री. मोतीचंद शहा, श्री. साळवेकर (सरदारगृहाचे मालक), श्री. पु. रा. लेले, यांचीं नांवें

त्यांनीं दिलेलीं नाहीत. यांतले बहुतेक लोक विद्वान आहेत आणि त्यांना संस्कृतीची पर्वा नाही असें म्हणतां येणार नाही. यांपैकी कित्येकांना दुसरी बायको करण्यास अत्यंत योग्य सबबी असतील, परंतु अितरांच्या सबबी योग्य नाहींत असें म्हणण्याचा हक्क कोणाला आहे? यांत कित्येक नांवाजलेले प्रोफेसर, डाक्तर, वगैरे लोक आहेत. त्यांच्या तोलाचीं किती माणसें या संस्कृतिविध्वंसकांत सांपडतील? की ज्यांना अेरवीं कोणीच कांही महत्व देणार नाही, अशा कांही फालतू लोकांनी हा 'येन केन प्रकारेण' प्रसिद्धि मिळवण्याचा मार्ग शोधून काढला आहे? यांच्या संस्कृतीला ना शेंडा ना बुडखा. या संस्कृतीच्या ढोंगाला कोणी काय म्हणून महत्व द्यावें? बड्या लोकांनी अनेक लग्नें केलीं, किंवा उघडपणें रखेल्या ठेवल्या, तरी यांना चालतात, फक्त गरिबाने दुसरें लग्न केलेलें यांना चालत नाही. कित्येक ठिकाणीं प्रत्येक सुखवस्तु मनुष्याला अेखादी रखेली पाहिजेच अशी प्रथा अजूनही आहे, अितकेंच नव्हे तर या मंडूकांच्या ठरावण्याने जर यदाकदाचित् अेकपत्नीचा सक्तीचा कायदा झाला, तर या प्रथेला उत्तेजन मिळेल.

या लोकांचा आणखी अेक डाव म्हणजे अशी हुल्लड करून वेणूबाअींना हुजूरपागेंतून हुसकून लावायचें. आणि त्या शाळेच्या नियामक मंडळाचाही तसाच बेत दिसतो. या मंडळावर सर रघुनाथ परांजपे, रा. ब. के. जी. जोशी, सरदार काळे, बॅ. गाडगीळ, सौ. येसूबाई कुळकर्णी, श्री. अेच्. जी. घारपुरे ( आय्. सी. अेस्. ), श्री. आर्. अेस्. दीक्षित, सौ. प्रमिलाबाअी गाडगीळ वगैरे माणसें आहेत, पैकीं सौ. गाडगीळ या त्यांना काढून टाकण्याच्या विरुद्ध आहेत व सौ. येसूबाअी कुळकर्णी सभेला गैरहजर होत्या ( कां तें पुढें पहा ), पण बाकीच्यांचें अेकमत झालें असें समजतें. यांपैकी सर रघुनाथ परांजपे यांचे गुरु नामदार गोखले आणि डॉ. के. के. जोशी हे दोघेही त्यांच्याच कालेजांत प्रोफेसर होते, पण त्यांच्याविरुद्ध त्यांनी कधी ब्र काढला नाही, अितकेंच नव्हे तर नामदार गोखल्यांना दोन बायका होत्या असें म्हणणें देखील त्यांच्या मताने पाप आहे! या दोघांमुळें फर्गसन कालेजांतली मुलें बिघडलीं नाहीत,

पण वेणूबाओी हुजूरपागेंत राहिल्या तर तेथल्या मुली मात्र बिघडतील, असें त्यांचें मत दिसतें ! शिवाय नियामक मंडळाच्या अेक समासद सौ. येसूबाओी कुळकर्णी ( रा. ब. डॉ. कुळकर्णी यांच्या पत्नी ) यांचाही विवाह अशाच प्रकारचा आहे हें त्यांना माहीत असूनही त्या मंडळावर घालतात ! त्या गैरहजर राहिल्या याचें कारण उघडच आहे. हजर राहून वेणूबाओींना पाठिंबा देण्याचा त्यांना धीर झाला नाही. अितर सभासदांबद्दल आम्ही कांही लिहीत नाही, पण त्यांना न्यायाची कल्पना किती आहे हें अेवढ्यावरूनच दिसेल.

सुदैवाने वेणूबाओी सरकारी नोकर आहेत आणि हुजूरपागेच्या अधिकाऱ्यांनी कितीही मूर्खपणा केला तरी त्यांची नोकरी जाण्याचा संभव नाही, कारण त्यांनी कोणतेंही नीतिबाह्य किंवा बेकायदा वर्तन केलेलें नाहीं. या संस्कृतिवाल्या लोकांचें म्हणणें असें दिसतें की जें काय करायचें असेल तें चोरून करा, विनाकारण विवाह करून त्याचा बभ्रा करूं नका. धोपट मार्गाने गेलांत की फसलांत ! आमच्या संस्कृतीला प्रामाणिकपणा खपत नाही.

पण विवाह उघडपणें झाला असला तरी ती खाजगी बाब आहे, त्यांत शाळेचा कांही संबंध पोंचत नाही आणि मंडळाने तिकडे लक्ष देण्याचें कारण नव्हतें. पण उपद्व्यापी लोकांना स्वस्थ कसें बसवेल ? निषेधाच्या सभेंत फक्त डॉ. अिरावती कर्वे या विरुद्ध बोलल्या असें समजतें, पण त्यांना पांच मिनिटांपेक्षा जास्त बोलूं दिलें नाही. त्यांनी सांगितलें की असे विवाह अनिष्ट असले तर त्यांचा केवळ निषेध करून भागणार नाही. ते कां होतात याची कारणमीमांसा करून तीं कारणें दूर करणें जरूर आहे. समंजस सुशिक्षित लोक अशा विवाहांना तयार होतात, त्याअर्थी त्यांचीं तशींच कांही कारणें असलीं पाहिजेत. त्यांचा निषेध करून भागणार नाही.

आमची खाजगी माहिती अशी आहे की श्री. हर्षे यांच्या प्रथम पत्नीनेच या विवाहाबद्दल आग्रह धरला होता, व त्या वेणूबाईशीं अजूनही सलोख्याने वागतात.

---

# पत्रव्यवहार

## १ ( संक्षेप )

आमचे जातींपैकी अेक मुलगी पुण्यास दिलेली होती. ती आमची नातलग असल्यामुळे अेकदोन वर्षांनी आमचेकडे राहण्यास येत असे. परंतु गुदस्त सालीं ती नवऱ्यासह आली होती व येण्याचें कारण म्हणजे तिला मूल होत नव्हतें, व आमचे गांवदेवीस नवस केल्याने मूल होतें अशी ख्याती असल्यामुळें व दर तीन वर्षांनीं जत्रा भरते ती पाहण्याकरतां तीं आलीं होतीं. 'आतां नवसानें मुलें होतात, तेव्हां नवऱ्याची गरज नाही,' असा आम्ही विनोद केला, तेव्हां ती शिकलेली असल्यामुळे ती म्हणाली, 'तसें नव्हे, तो अेक जिवास आधार आहे.' अेके दिवशीं फिरावयास गेलों असतां मी विचारलें, 'तुम्हाला खरोखर मूल पाहिजे काय ?' ती म्हणाली, 'होय. सासूबाअीसुद्धां मला मूल झालेलें पाहीन अशी अिच्छा करून मरून गेल्या. आणि आतां घरांत दुसरें कोणी नाही.' मी म्हणालों, 'खरोखर मूल पाहिजे असेल तर कर्व्यांच्या कामशास्त्रांत उपाय सांगितलेले आहेत ते करून पाहावे, नवसाने होणार नाही.' तिने कोणते उपाय सांगितलेले आहेत असें विचारल्यावर मी सांगितलें की नवऱ्याचें रेत डाक्तराकडून तपासून त्यांत रेतजंतू आहेत की नाहींत तें पहावें, नसतील तर नवऱ्याकडून मूल होणार नाही. म्हणजे मूल पाहिजे तर तें दुसऱ्या पुरुषाकडूनच होणार. याकरतां प्रत्यक्ष दुसऱ्या पुरुषाशीं समागम करणें नसल्यास त्याचें रेत डाक्तराकडून गर्भाशयांत घालतां येतें. यावर ती म्हणाली, 'मी कामशास्त्र वाचून काय तें ठरवीन.' त्याप्रमाणें नवराबायकोने कामशास्त्र वाचल्यावर नवऱ्याचें मत असें पडलें की रेत गर्भाशयांत घालून गर्भ राहण्याची व्यवस्था करावी, व तिचें म्हणणें असें की कसेंही केलें तरी सारखेंच, व दुसरें असें की प्रत्येक वेळीं डाक्तराकडे जावें लागणार, व सर्वच डाक्तर प्रामाणिक असतात असें नाही. अशा परिस्थितीचा एखादे वेळीं डाक्तराने फायदा घेतल्यास साराच व्यवहार चोरटा असल्यामुळे कांही बोलतां येणार नाही. त्यापेक्षा एखाद्या चांगल्या मनुष्याशीं समागम करून मूल करून घेतल्यास बरें. असें दोघांत ठरलें, व नवऱ्याची रजा संपल्यामुळे तो निघून गेला, व

बायकोस आणखी पंधरा दिवसांनी येण्यास सांगितलें. मी विचारलें, ‘काय ठरवलें आहे ?’ तेव्हां ती म्हणाली, ‘अिकडेतिकडे बघण्यापेक्षा आपल्यासारख्या माहीतगाराशीं संबंध असलेला बरा. येथें राहून उपयोग न झाला तर आपण कसेंही करून पुण्यास आमचेकडे दोन महिने राहण्यास या.’ तेव्हां मी सांगितलें की ‘माझें दुकान असल्यामुळे ज्येष्ठ व आषाढ या दोन महिन्यांत येण्यास मिळेल व पुणेंही पाहण्यास मिळेल. तेव्हां ज्येष्ठांत आपण बाहेरची झाल्यावर मला कळवा, म्हणजे मी येअीन, पण बाकी जबाबदारी तुमचेवर.’ तेव्हां ती म्हणाली ‘खर्चासुद्धां काय ?’ तेव्हां मी म्हणालों, ‘खर्चाचें नव्हे, पण अशा गोष्टीस नवऱ्याची संमति नसल्यास खुनापर्यंत मजल येते.’ ती म्हणाली, ‘त्यांची संमति नसली तर मलासुद्धां घराबाहेर जावें लागेल.’ त्याप्रमाणें पत्र आल्यावर मी गेलों. दुसऱ्या दिवशीं नवरा पंधरा दिवसांचे रजेवर बाहेरगांवीं जाण्यास निघाला. तेव्हां मी म्हणालों, ‘मीही येऊं काय ?’ यावर तो म्हणाला, ‘घरांत ती एकटीच आहे, तेव्हां तुम्ही सोबतीस रहा.’ तेव्हां ही अप्रत्यक्ष कबुली मिळाली असें समजून मी राहिलों. आम्ही एकत्र निजत असूं. अेके दिवशीं ती म्हणाली, ‘माझी अिच्छा आज पुरी झाली असें वाटतें.’ तेव्हां मी म्हणलों, ‘कशावरून ?’ ती म्हणाली, ‘माझा गर्भाशय अेकदम आकुंचित झाला यावरून गर्भ राहिला असें वाटतें.’ मी म्हणालों, ‘ठीक आहे, अशाच पडून रहा.’ या दिवसापासून आम्ही समागम बंद ठेवला व यंदांच फाल्गुन महिन्यांत सदर बाअी बाळंत होऊन मुलगा झाला आहे. तेव्हां रेत गर्भाशयांत शोषलें जाऊन गर्भ राहिला हें लगेच स्त्रियांस कळूं शकतें की काय, हें कळवण्याची मेहरबानी करावी. आपला ५०१.

उ. गर्भाशयाचें तोंड उघडून रेत आंत शोषलें जाणें ही स्त्रीच्या पूर्ण कामपूर्तीची खूण आहे, गर्भ राहिल्याची नव्हे. रेत आंत शोषलें गेलें व त्याच क्षणीं गर्भ राहिला हें जवळ जवळ अशक्य आहे, कारण रजोगोल त्या क्षणीं गर्भाशयांत असेल असें क्वचितच घडेल. रेत व रजोगोल यांच्या संयोगाचे वेळीं स्त्रीला कोणतीही संवेदना होते असें वाटत नाही. आपल्याला आत्तां गर्भ

राहिला अशी कांही स्त्रियांची कल्पना मात्र होते हें आम्हास माहीत आहे, परंतु ती केवळ कल्पनाच समजणें भाग आहे. सं.

२.

आपला मे १९४३ चा अंक वाचला. त्यांतील पत्रव्यवहार वाचून मलाही आपली हकीकत सांगावीशी वाटते, व त्यावर आपणाकडून योग्य सल्ला मिळेल असें वाटतें. आपल्या सूचना माझ्यासारख्या अितर भगिनींना मार्गदर्शक होतील अशी खात्री वाटते. माझें लग्न वयाच्या सतराव्या वर्षी झालें. पति बिजवर, पांच मुलें असलेले, व माझ्यापेक्षा वयाने वीस वर्षें मोठे, असे होते. ते शरीराने स्थूल, रंगाने काळे, ओंगळ, व अगदीच अरसिक, बेडौल व बावळट असे होते. मी शरीराने नाजूक, स्वरूपवान व हुशार अशी असें. मला त्यांच्याशीं लग्न करण्याची बिलकुल अिच्छा नव्हती, पण मला पूर्ण समजत नव्हतें म्हणा, अथवा परिस्थितीमुळे व वडील माणसांच्या आग्रहाला बळी पडून त्यांच्याशीं लग्न करणें भाग पडलें. ते माझ्याजवळ येतांच मला शिसारी आली, व त्यांचेकडून माझ्यावर जणूं काय कायदेशीर बलात्कारच सुरू झाला. ते अतिशय आचरट असत व अेकांतांत जरापण कुशलता नसे. मी डोळे मिटून दुःखाने हें सर्व सहन करीं. लग्नानंतर तीनचार दिवसांनी आम्ही त्यांच्या नोकरीच्या ठिकाणीं आलों. माझी तब्येत बरी नव्हतीच. मला मनस्वी त्रास व संताप येअी. तेथे आल्यावर त्याच दिवशीं त्यांचे एक स्नेही, जे जवळच रहात होते, ते त्यांचेकडे आले. त्यांचें वय पंचविशीच्या सुमाराचें होतें. ते फारच देखणे, हुशार, मनमिळाऊ, सडपातळ बांध्याचे व गोरे होते. माझ्या पतीने माझी त्यांच्याशीं ओळख करून दिली. मी पथारीवर निजलें होतें, त्यांनी माझ्या डोक्यावरून हात फिरवला. माझें डोकें दुखतच होतें व अंगांत तापही होता. त्यांनी अंगास स्पर्श करून तापही पाहिला. त्यावेळींच त्यांचें व माझें प्रेम जमलें. मला वाटलें चार दिवसांपूर्वी ही ओळख झाली असती, तर मी आज कितीतरी आनंदांत असतें. त्यांना माझ्या स्थितीबद्दल फारच वाअीट वाटलें. ते विवाहित होते, तरी त्यांना माझ्या सहवासांत फारच आनंद वाटे, व मलाही त्यांचे सहवासांत अत्यानंद होई.

माझे पति बावळट असल्याने व डोळ्यांनी थोडे अधू असल्याने त्यांच्या लक्षांत ही गोष्ट कधीच आली नाहीं. माझ्या नवीन मैत्रीमुळे व त्यांच्या सहानुभूतीमुळे मी माझ्या पतीचा संसार जेमतेम करूं लागलें. पण लौकरच आम्हाला नोकरी-मुळे तें गांव सोडावें लागलें. तरीपण माझे मित्र मला वर्षादोनवर्षांत आमच्या गांवीं एकदोन दिवस भेटण्यास येत, व तेवढ्यावरच मी माझी जीवनयात्रा चालू ठेवीं. दहा वर्षांच्या आंतच माझे पति अिहलोक सोडून गेले. या गोष्टीलाही आज पंधरा वर्षें झालीं. माझे मित्र मला पूर्वीप्रमाणेंच अजून भेटतात. या दहा वर्षांच्या अवधींत माझ्या पतीने कांही सुख तर दिलें नाहीच, पण तीन मुलांच्या बेड्या पायांत टाकून गेले. माझ्या मित्रांचें प्रेम मजवर पूर्वीप्रमाणेंच आहे व ते माझ्याशीं पुनर्लग्न करण्यास तयार आहेत. मला पण त्यांच्याशीं लग्न करावेंसें वाटतें, पण मुलें असल्यामुळे मला धीर होत नाही. समाज काय म्हणेल, मुलांना काय वाटेल, या चिंतेंत मी पतिनिधनानंतर पंधरा वर्षें काढलीं. माझीं मुलें आतां संसाराचा भार उचलीत आहेत व मलाही आर्थिक स्वातंत्र्य आहे. माझ्या मित्राच्या पत्नीला ही गोष्ट ठाऊक नाही. ती माझ्याशीं सख्ख्या बहिणीप्रमाणें वागते. ते आपल्या पत्नीला पण उत्तम रीतीने वागवतात, पण माझ्याशिवाय त्यांना चैन पडत नाही. माझी पण स्थिती तशीच आहे. त्यांचेशिवाय जगणें व्यर्थ वाटतें. एक दिवस सुद्धां आम्हाला एकमेकांची आठवण झाल्याशिवाय जात नाही. आज ह्या गोष्टीला पंचवीस वर्षें झालीं, तरी आम्ही अेकमेकांस भेटतों तेव्हां पहिल्या भेटीअेवढाच किंबहुना त्याहूनही जास्त आनंद होतो. ज्याला खरें प्रेम म्हणतात तें आमच्या दोघांत आहे. पति-निधनापासून मी संततिनियमनाचीं साधनें वापरतें, यामुळे त्यांचेपासून मूल होण्याचा प्रसंग आला नाही. पण हल्ली केव्हां केव्हां वाटतें की लग्न केलें तर किती मजा येअील ! आमच्या दोघांच्या प्रेमाने झालेली संतति कितीतरी तेजस्वी होअील. पण हें शक्य आहे का ? किंवा आमच्या प्रेमाचा असाच दुःखद शेवट होणार ? पुनर्जन्मावर विश्वास ठेवूनच दिवस कंठावे का ? आपली.......

उ. आपल्या लग्नाच्या बाबतींत आपला व आपल्या पतीचा दोघांचाही

अविचारच होता. पूर्ण विचार करण्याअितकें आपलें वय नव्हतें ही सबब आपल्या बाबतींत कदाचित् चालेल, परंतु आपल्या पतीचे बाबतींत तीही नव्हती. परंतु बाजारांत जाऊन अेखादें सुंदर घड्याळ जसें खरेदी करून आणावें, त्याचप्रमाणें, तितक्याच बेपर्वाअीने, पुष्कळ पुरुष अेखादी सुंदर बायको करून घरीं आणतात. तिला आपल्याबद्दल काय वाटेल, हा विचारही त्यांना कधी शिवत नाही. अशा स्थितींत जो परिणाम सामान्यतः व्हायचा, तोच आपल्या बाबतींत झाला यांत नवल नाही. आपण सल्ला विचारतां त्याअर्थी सांगणें भाग आहे की आपण आहांत त्याच स्थितींत सुखी आहांत. लग्न केल्याने आपणास अधिक सुख मिळेल, किंवा दुःख मिळणार नाही, अशी बिलकुल खात्री वाटत नाही. लग्न केल्यास समाज नांवें ठेवील, मुलेंही बहुधा नांवें ठेवतील, आणि याचा परिणाम दोघांवरही झाल्याशिवाय राहणार नाहीं. आपल्या मित्राची बायको हल्लीं बहिणीसारखी वागते, ती नंतर शत्रु होअील. आपल्याला अधिक सुखाची आशा म्हणजे अेकच, की पुढें मुलें होण्यास आडकाठी राहणार नाही. आपलें वय हल्ली ४२ आहे. यापुढें मुलें होणें अशक्य नाही, पण होतीलच असें म्हणतां येत नाही. शिवाय मुलें तेजस्वी होतील ही केवळ आशा आहे. दोन्ही माणसें हुशार आणि सुंदर असलीं, तरी मुलें सुंदर आणि तेजस्वी होतीलच असा नियम नसतो. याच्या विरुद्ध पुष्कळ उदाहरणें सांपडतात. तेव्हां केवळ अेवढ्याकरतां अनेकांना दुःखी करणें बरें नव्हे असें आम्हास वाटतें. हल्ली सुखी आहां तशाच रहा, आणि अधिक सुखाची आशा सोडा, असा आमचा सल्ला आहे. **सं.**

---

**श्री. ल. दे. ठोसर** लिहितात (सारांश):—'कांही नमुने' या सदराखाली माझे कांही लेख आपल्या मासिकांत प्रसिद्ध झाल्यामुळे माझे कांही मित्र तशाच आणखी लेखांची अपेक्षा करीत आहेत असें दिसतें. मी पक्षघाताच्या आजारामुळे कांही दिवस मालवण येथे डॉ. कुडाळकर यांचे अिस्पितळांत रहात असतां आजारांतून दुसरीकडे मन वळवण्याकरतां मी ते लेख लिहिले. आरंभीं मला सही करण्यासही त्रास वाटत होता, पण नंतर हे सर्व लेख मी स्वतः लिहूं शकलों. आतां आणखी लिहिण्याचा विचार नाही. या लेखांत जसे मीं आपले अनुभव लिहिले, तसे अितर वाचकही आपले अनुभव लिहून प्रसिद्ध करतील अशी मी आशा करतों.

---

# शारदेचें पत्र

विचार करणाराला ज्या गोष्टी सरळ सरळ दिसतात, त्या नाकबूल करणें हें कांही लोकांना मोठेपणाचें लक्षण वाटतें, आणि कांहींना विचार करतांच येत नसल्यामुळे ते या तथाकथित मोठ्या लोकांप्रमाणें बोलूं लागतात. अेका पुरुषाचा अेकाच स्त्रीशीं आणि अेका स्त्रीचा अेकाच पुरुषाशीं संबंध असावा, ही विलक्षण खुळी कल्पना कोणत्या शहाण्याच्या डोक्यांत प्रथम आली असेल ती असो, पण तिने आज जगांत धुमाकूळ माजवला आहे. पुरुषांना ही कल्पना अर्थातच फक्त स्त्रियांपुरती मान्य असते आणि स्वतःला ती लागू करण्याची बिलकुल अिच्छा नसते. पण तसें म्हणायची बहुतेक पुरुषांची छाती होत नाही. दोघांनाही तोच कडक नियम लावावा असें म्हणणारेच फार, पण त्यांना पक्कें माहीत असतें की पुरुषांना तोच नियम जरी कायद्याने लावतां आला, तरी तो प्रत्यक्ष अंमलांत आणणें शक्य नसतें. तेव्हां अेकपत्नीव्रताचा कायदा करण्यांत पुरुषांचें कांहीच नुकसान नाही. फक्त घरांत दोन बायका ठेवतां येणार नाहीत अितकेंच. किंवा मला वाटतें घरांत देखील अेक बायको आणि अेक रखेली ठेवायला कायद्याचीही हरकत नसतेच ! तेव्हां त्यांची तेवढीही अडचण होणार नाही. त्यांतल्या त्यांत विशेष प्रतिष्ठित मानलेल्या लोकांना घरांत उघड रखेली न ठेवतां आली तरी ती अन्य मिषाने ठेवतां येतेच हें आपण दररोज पाहतों. मग हें ढोंग कशा-करतां ? प्रतिष्ठा मिळवण्याचे दुसरे कांहीच मार्ग ज्या पुरुषांना सांपडत नाहीत, त्यांना असल्या ढोंगांनीच प्रतिष्ठा मिळवावी लागते हें खरें, पण समंजस पुरुषांना त्यांत सामील व्हायचें कारण नाही.

सपत्नीविवाहाचे बाबतींत—हा शब्द मला सावत्रविवाहापेक्षा बरा वाटतो—हल्ली कांही सुशिक्षित स्त्रिया ' धनुर्धारी ' पत्रांत लिहीत असतात. त्याही विशेष विचार करतात असें दिसत नाही. त्यांत कांही पुरुषांची तरफदारी करणाऱ्या आहेत आणि कांही त्यांना नांवें ठेवणाऱ्या आहेत. पुरुष असे कां वागतात याचें

कारण एकोलाही कळलेलें आहे असें दिसत नाही. नाहीतर त्यांनी बौद्धिक भुकेच्या ढोंगाला महत्व दिलें नसतें. ज्यांनी एक बायको असतांना दुसरीं लग्नें केलीं, त्या सर्वांच्या पहिल्या बायका अशिक्षित होत्या असें नाही. दोन पुरुषांत जेव्हां स्नेह होतो, तेव्हां ते दोघे सारखेच सुशिक्षित असले पाहिजेत असा नियम नसतो. हें शिक्षणावर अवलंबून नसतें आणि सौंदर्यावरही नसतें. कधी पहिली बायको आवडत नसल्यामुळे अशीं लग्नें होतात हें खरें, पण पुष्कळ वेळां याचें खरें कारण वैचित्र्याची अिच्छा हें असतें. आणि हें कारण एकदां कळलें की मग पहिल्या बायकोच्या अंगांत कोणते गुण आहेत याचा संबंधच रहात नाही. हल्ली पहावें तों एखाद्याने दुसरी बायको केली की पहिल्या बायकोचे गुण एकदम अितके वाढतात की कोणाला वाटेल अशी बायको त्रिभुवनांत मिळायची नाही! हें सगळें ढोंग आहे. मी जें कारण सांगितलें तें पहिली बायको कशीही असली तरी लागू पडतें. पहिल्या बायकोवरचें प्रेम उडून दुसरीवर बसतें, हीही कल्पना चुकीची आहे. पहिल्या बायकोवर प्रेम असतांहि दुसरीवर बसूं शकतें, ही गोष्ट अनेक कादंबरीकारांनी मान्य केलेली आहे, आणि 'जागृति'कारांना कदाचित् शंका उत्पन्न होअील म्हणून मी हेंही सांगतें की हें स्त्रियांच्या बाबतींतही खरें आहे. द्रौपदीला पांच नवरे असतांनाही सहावा कर्ण असता तर बरें झालें असतें असें वाटल्याची जी हकीकत आहे, तींत ही स्पष्ट कबुली आहे. हल्लीच्या स्थितींत सामान्य स्त्रियांना आपली वैचित्र्याची आवड दाबून ठेवावी लागते, किंवा चोरून पुरवावी लागते, आणि 'स्त्रियश्चरित्रम्' म्हणून जें प्रसिद्ध आहे तें हेंच.

या साध्या गोष्टी न कळल्यामुळे अविचारी लोक भरमसाट विधानें करीत सुटतात. उदाहरणार्थ 'महाराष्ट्र' मासिकाचा जूनचा अंक पहा. हर्षे-पानसे विवाहाचे बाबतींत त्यांनीं जे उतारे दिले आहेत आणि जीं विधानें केलीं आहेत, तीं अविचाराचीं अप्रतिम उदाहरणें आहेत. केसरीकार म्हणतात, 'नोंदणी-पद्धतीनें विवाह करतां येत नाही यासाठीं वैदिक विवाहपद्धतीचा आश्रय करण्याचा देखावा करणें हें अश्लाघ्य होय... समंजस माणसें देखील जेव्हां धार्मिक विधीच्या बुडाशीं असलेल्या पवित्र हेतूंचा विपर्यास करतात, तेव्हां असलीं ढोंगें

कायद्यानें बंद पाडलीं पाहिजेत असें म्हणणें प्राप्त होतें.' अशा विवाहांना धर्माची परवानगी आहे, तरमग 'पवित्र हेतूंचा विपर्यास' याचा अर्थ काय ? माझ्या माहिती-प्रमाणें कोणत्याही प्रकाराने विवाह केलेलीं माणसें विवाहानंतर अेकाच तऱ्हेने वागतात. मग वैदिक विधीचें पावित्र्याचें ढोंग कां ? विविध-वृत्ताचे 'आलमगीर' म्हणतात, 'विकाराधीन होऊन जे संयमहीन स्त्रीपुरुष असे अत्याचार करूं लागले आहेत, त्यांना शक्य होईल तेथे शासन करण्याचा चंग समाजानें बांधला पाहिजे असें मी म्हणतों.' हें म्हणणें बेअकलीपणाचें आहे. पुण्यांतल्या कांहीं बऱ्या लोकांनी उघडपणें रखेल्या ठेवलेल्या पुष्कळांना माहीत असतील. त्यांचें समाजानें काय केलें होतें ? जे विवाहबाह्य संबंध न ठेवतां राजरोस विवाहाचा मार्ग पत्करतात, त्यांनाच शिक्षा करायला या नीतिबाजांचे हात वळवळतात. पत्नीला हुजूरपागेच्या शिक्षणसंस्थेंतून काढून टाकावें अशी सूचना पुष्कळांनी केली आहे आणि हर्षे यांचें आपल्याला कांही करतां येत नाही म्हणून संपादकांना वाअीट वाटत आहे. पण संपादकांना हें माहीत नसावें की त्यांची पत्नीही सरकारी शिक्षणखात्यांतच आहे, आणि हुजूरपागेंतून काढणें म्हणजे नोकरीवरून बडतर्फ करणें नव्हें. त्यांचें वर्तन कोणत्याही रीतीने नीति-बाह्य, धर्मबाह्य, किंवा बेकायदा ठरत नाही, तेव्हां सरकार त्यांना काढून टाक-ण्याचा मूर्खपणा करणार नाही. पुण्याच्या शहाण्यांनी आपल्या अकलेचें प्रदर्शन वाटल्यास करावें, पण त्याने कोणाचेंही कांही वांकडें होणार नाही.

हा संपादकीय लेख म्हणजे असमंजसपणाचा कळस आहे. उदाहरणार्थ 'युरोप-अमेरिकेमधें स्वातंत्र्य आहे. लोकांची सांपत्तिक स्थिति हिंदुस्थानच्या मानाने शतपटीने चांगली आहे. असें असतां देखील तेथे कायद्याने एक वेळां एकच पति व पत्नी करतां येते. हें जर खरें आहे, तर सांपत्तिक दृष्टया खालावलेल्या हिंदुस्थान देशांत अेकाच वेळीं दोन बायका करण्याची काय जरूरी आहे ? उलट हिंदु-स्थानची प्रजा फार वाढत आहे म्हणून संततिनियमनाचा प्रचार शकुंतलाबाअी जोरजोराने करीत आहेत.' यांत सांपत्तिक स्थितीचा संबंध कोठे येतो हें समजणें कठिण आहे, पण तो येतो असें धरून चाललें, तरमग निदान श्रीमंतांना दोन

बायकांची परवानगी द्यायला काय हरकत आहे? या गृहस्थांची अशीही कल्पना दिसते की जास्त बायका करूं दिल्या तर देशाची लोकसंख्या वाढेल. हें गणित अजब आहे! त्यांची अशी कल्पना आहे काय की दोन बायकांना दोन नवरे असले तर त्यांना मुलें कमी होतील, आणि दोघींत अेक नवरा असला म्हणजे मुलें जास्त होतात? की असे विवाह करणाऱ्या बायकांचीं अेरवीं लग्नें झालींच नसतीं? तसें असेल तर त्यांचाही कांही सहानुभूतीने विचार करणें जरूर आहे, आणि तसें नसलें तर लोकसंख्या कमी कशी होओल?


सर्वांत आचरटपणाचा कळस म्हणजे त्यांनी ज्या दोन गोष्टी होणें जरूर आहे म्हणून आंकडेवार दिल्या आहेत त्या. पहिली गोष्ट म्हणजे घटस्फोटाचें व स्त्रियांच्या वारसाहक्काचें बिल पास झालें पाहिजे, आणि दुसरी शक्कल यांच्या स्वतःच्या डोक्यांतली असावी. ती म्हणजे 'मुलीचा विवाह २४ वर्षांच्या आंत झालाच पाहिजे असा कायद्याने दंडक घालण्यांत यावा.' संपादकांनी अेक विवाह-संस्था काढलेली आहे, तेव्हां मुलींना स्थळें पाहून देण्याचें काम ते अंगावर घेतीलच, पण २४ वें वर्ष संपत आलें, म्हणजे जो कोणी मिळेल त्याच्याशीं विवाह करणें किंवा जन्मभर अविवाहित राहणें, यांतच मुलींना निवड करावी लागेल. मला वाटतें हिटलरने देखील अितका जुलूम कोणावर केला नसेल. त्याला लोक-संख्या वाढायला पाहिजे होती, तेव्हां त्याने अविवाहित मुलींना सरळ प्रजोत्पत्ति करायला सांगितलें. अर्थात् हा २४ वर्षांचा कायदा करण्याचें कोणी मनांत आणलेंच, तरी विवाहबाह्य संबंधाला आडकाठी राहणार नाही, अितकेंच नव्हे तर अेकपत्नीव्रताचा कायदा आणि हा कायदा हे निःसंशय समाज ज्याला हल्ली अनीति म्हणतो अशा प्रकारांना उत्तेजन देणारेच ठरतील.

आजमितीला उघडपणें विवाहाशिवाय संबंध ठेवणाऱ्या थोड्याबहुत तरी सुशिक्षित स्त्रिया सर्वांना दिसत आहेत, त्यांची संख्या या कायद्यांनी वाढेल अितकेंच. हें एका तऱ्हेने अिष्टच होईल आणि अशाच बऱ्याच स्त्रिया राहूं लागल्या, म्हणजे हळू हळू त्यांना मुलें झालीं तरीही कोणी कांही म्हणणार नाहीं. तथास्तु.

फ्रान्सचा पराभव कां झाला याचीं अनेकांनी अनेक कारणें दिलीं आहेत. त्यांतला त्यांत ज्यांच्या मूर्खपणामुळे हा पराभव झाला, त्यांनी स्वतःचा दोष झांकण्याकरतां फ्रेंच लोकांवर सुखासीन वृत्ति, चैनबाजी वगैरे आरोप केले आहेत. परंतु ज्यांना म्हणून कांही तारतम्यबुद्धि आहे, त्यांच्या लक्षांत या आरोपांतला फोलपणा आला पाहिजे होता. मागें मार्शल पेताँचें अशा प्रकारचें म्हणणें खरें धरून केसरीने जो आचरटपणा केला होता तोच आचरटपणा 'ध्रुव'च्या संपादकांनी जुलैच्या अंकांत केला आहे. फ्रान्सचा पराभव कां झाला हें आतां सर्वांना कळलें पाहिजे. ज्यांना कळलें नसेल त्यांनी प्रसिद्ध फ्रेंच लेखक जूल रोमँ याचें 'सेव्हन मिस्टरीज ऑफ यूरप' म्हणून पुस्तक नुकतेंच प्रसिद्ध झालें आहे तें जरूर वाचावें. त्याचा स्वतःचा त्यांत संबंध नसल्यामुळे त्यानें खरीं कारणें दिलीं आहेत. या युद्धांत रणगाडे आणि विमानें याचें किती महत्व आहे हें फ्रेंचांनी ओळखलें नाही आणि तशी तयारी ठेवली नाही, म्हणून हा पराभव झाला, चैनबाजीमुळे नव्हे. अिंग्लंडचीही तीच स्थिति होती, आणि योग्य वेळीं हिटलरने जर अिंग्लंडवर स्वारी केली असती तर इंग्लंडचाही तसाच पराभव झाला असता असें अिंग्रजांनी कबूल केलेलें आहे. जनरल गॅम्लँ यांनी जूल रोमँजवळ युद्धारंभीं असें सांगितलें की माझें सैन्य जय्यत तयार आहे. पण विमानांचें काय, असें विचारतां तें माझें काम नव्हे असें त्यांनी सांगितलें. ही मुत्सद्यांची आणि सेनापतींची चूक आहे, चैनबाजीची नव्हे. फ्रेंच लोकांवर चैनबाजीचे आरोप अिंग्रज लेखक प्राचीन काळापासून करीत आले आहेत. तरीदेखील नेपोलिअनने यूरोप हालवून सोडलें. तेथे संततिनियमन आज सवाशें वर्षे प्रचारांत आहे, आणि तरी गेल्या युद्धांत ते यशस्वी झाले. तेव्हां आजच फ्रान्सची लोकसंख्या कमी झाली हें संभवत नाही. केसरी आणि ध्रुव यांसारख्या पत्रांच्या संपादकांनी यापेक्षा अधिक तारतम्य दाखवलें नाही तर त्यांचें संपादकीय कौशल्य काय राहिलें ?

तुझी **शारदा**

---




सर्व औषधविक्रेत्यांकडे मिळतें.

एजंट्स् :— **कृपाग लिमिटेड, 'आर्केडिआ,'**

**१७२, सर भालचंद्र रोड, दादर, मुंबई–१४.**

# आमचेकडे मिळणारा माल

**डच कॅप**, प्रत्येकीं... .... .... रु. ४–८–०

**राईट जेली** (आम्ही बनवलेली), नळीशिवाय, रु. ३–८–०

**राइटचूब** (रोगप्रतिबंधाकरतां), अेका नळीस रु. १–०–०

**कषायचूर्ण** (योनिमार्ग पिचकारीने धुतेवेळीं
पाण्यांत घालण्याचें सुवासिक, आकुंचक
चूर्ण) बाटलीस रु. २–८–०

**राइट हेअर लोशन** (डोक्यांत कोंडा झाल्याने
केंस गळून पडतात, तो हें वापरल्याने
होत नाही) बाटलीस रु. ३–०–०

**द्युमास कॅप**, प्रत्येकीं .... .... रु. ४–०–०

**राइट एजन्सी,**

**१३, नवी भटवाडी,**

**मुंबई–४.**

**मैत्रीण पाहिजे.** सी. पी. मधें राहणाऱ्या अेका सुशिक्षित तरुणास २०–२५ वर्षांपर्यंत पांढरपेशा समाजांतील सुंदर, सुशिक्षित मैत्रीण पाहिजे. आर्थिक मदत लागल्यास मिळेल. पत्रव्यवहार गुप्त. L C/o **समाजस्वास्थ्य.**

# समाजस्वास्थ्य

## मासिक मिळण्याचीं ठिकाणें :

**मुंबई व उपनगरचे एजंट :**

श्री. विठ्ठल बाबू बागवे, न्यूज एजंट, दादर.

**पुणें:** (१) एल्. के. जोशी बुकसेलर.

(२) प्रो. दि. धों. कर्वे, ६९–१ लॉ कॉलेज रोड, पुणें-४

( भेटण्याची वेळ, सकाळीं ७–३० ते ९–३० )

**कोल्हापूरः** स्कूल ॲन्ड कॉलेज बुकस्टॉल.

**बेळगांवः** जे. एम्. माणूरकर ॲंड ब्रदर्स, खडे बाजार.

**मडगांव, गोवाः** मंगेश बुक डेपो

**दक्षिण हैदराबादः** महाराष्ट्र न्यूज एजन्सी.

**इंदूरः** पुरोहित ॲन्ड सन्स्.*

**अहमदनगरः** पी. जी. बापट, बुकसेलर, नवी पेठ.

**कारवारः** मुजुमदार आणि कसबेकर

**रत्नागिरी :** शं. कृ. भट

**सावंतवाडीः** शिरोडकर ब्रदर्स.

**निपाणी :** के. एस्. बळगुर्गी

**उमरावती :** जी. के. रानडे ॲंड सन्स

**ग्वाल्हेर :** डोके ब्रदर्स, लष्कर.

**बेलापूर रोड :** ना. अ. पेंडसे.

**भुसावळ :** पी. टी. पुराणिक.

**गोकाकः** पी. एम्. शिरगांवकर,

---

* येथें आमचा इतर मालही मिळेल.

Registered No. B. 2289.

राइट एजन्सी, नं. १३, नवी भटवाडी, मुंबई नं. ४.

## प्रो. र. धों. कर्वे, एम्. ए. कृत इतर पुस्तकें

१. **आधुनिक आहारशास्त्र**, किं. १॥ रु., ट. ख. ५ आणे.
२. **आधुनिक कामशास्त्र** [ सचित्र ], तिसरी आवृत्ति
किंमत रु. २॥, ट. ख. ६ आणे.
३. **संततिनियमन** [ सचित्र ], ८ वी आवृत्ति,
किंमत १ रुपया, ट. ख. ४ आणे.
४. **गुप्त रोगांपासून बचाव** [ सचित्र ], ३ री आ.
किंमत १२ आणे, ट. ख. ४ आणे.
५. **'समाजस्वास्थ्य'** मासिकांतील निवडक लेख,
भाग १ ला [पहिलीं तीन वर्षें], २–४–०, ट.ख. ६ आ.
भाग २ रा [वर्षें ४–५–६], २–०–०, ट. ख. ५ आ.
दोन्ही भाग घेणारांस किं. ४–०–०, ट. ख. ८ आ.
६. **त्वचेची निगा**. किं. ८ आ. ट. ख. ४ आ.
७. **गुरुबाजी** (नाटक ) किं. ८ आणे, ट. ख. ४ आणे.
८. **वेश्याव्यवसाय**, किं. २ रु. ट. ख. ५ आ.
९. **तेरा गोष्टी**, किं. १ रु. ट. ख. ४ आ.

**डॉ. के. भा. लेलेकृत**

१. **बाहेरख्यालीचे दुष्परिणाम**, २ री आ., किं. ३ आ.
२. **मूळव्याध**. किं. २ आ.
व अनेक जादूचीं पुस्तकें, किंमत १ आणापासून २ रु.

**श्री. भास्कर धोंडो कर्वे, एम्. एड्. कृत,**

**मी कसा झालों ?** किं. ८ आ., ट. ख. ४ आ.

**प्रो. धों. के. कर्वे कृत**

**संक्षिप्त आत्मवृत्त**, किं. १२; ट. ख. ५ आ.